354

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २६/०६/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.५०/कोषा. प्रशा.५, दिनांक २५ जून, २०२४.

**विषय** :- शासकीय कार्यालयांच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांमध्ये शिल्लक असलेल्या अखर्चित शासकीय रकमांची अचूक व वस्तुनिष्ठ माहिती " अर्थसंकल्प अंदाज " वितरण व संनियंत्रण प्रणालीच्या माध्यमातून शासन स्तरावर उपलब्ध होण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत...

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४ / प्र.क्र.५० / कोषा. प्रशा.५, दिनांक २५ जून, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०६२५१५५९१७९१०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे /दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**शासकीय कार्यालयांच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांमध्ये शिल्लक असलेल्या अखर्चित शासकीय रकमांची अचूक व वस्तुनिष्ठ माहिती 'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीच्या' माध्यमातून शासन स्तरावर उपलब्ध होण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२४/प्र.क्र.५०/कोषा. प्रशा.-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक :- २५ जून,२०२४

**वाचा :-** १.शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१४९/२०१७/कोशा प्रशा-५, दि.४ जानेवारी,२०१८.
२.शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.८८/२०२३/कोशा प्रशा-५, दि.३ऑक्टोबर, २०२३.

**प्रस्तावना :-**

i. प्रचलित कार्यपध्दतीनुसार काही प्रकरणी राज्याच्या एकत्रित निधीमधून आहरीत केला जाणारा निधी प्रथम संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या चालू बँक खात्यांमध्ये किंवा योजनांसाठीच्या बचत बँक खात्यांमध्ये घेऊन, तद्नंतर विहित कार्यपध्दतीस अनुसरुन, संबंधित लाभार्थी व्यक्ती / संस्था किंवा अशासकीय कार्यान्वयन यंत्रंणा यांना संवितरीत केला जातो. परिणामी, सदर निधी काही काळ आहरण व संवितरण अधिकारी यांच्या चालू बँक खात्यांमध्ये किंवा योजनांसाठीच्या बचत बँक खात्यांमध्ये शिल्लक राहतो. अशा प्रकारे शासकीय कार्यालयांच्या स्तरावरील विविध बँक खात्यांमध्ये मोठया प्रमाणावर अखर्चित शासकीय रकमा पडून असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

ii. विविध बँकांमध्ये जमा असलेल्या या शासकीय अखर्चित रकमांबाबतची माहिती दरमहा प्राप्त होण्याकरीता उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेनंतर **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** (BEAMS) मध्ये सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्यांचेकडील सर्व बँक खाते प्रकार व सदर बँक खात्यांमध्ये जमा असलेली मागील महिन्याची शिल्लक अखर्चित शासकीय रक्कम याबाबतची माहिती सक्तीने भरणेबाबत व सदर माहिती भरल्यानंतरच **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मधून प्राधिकारपत्र तयार करण्याची सुविधा उपलब्ध होण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली होती.

iii. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासनाचे स्पष्ट निर्देश असतांनाही अनेक आहरण व संवितरण अधिकारी हे वारंवार बँक खात्यांतील शिल्लक रकमांबाबत अयोग्य, अपूर्ण व चूकीची माहिती **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये भरतात किंवा फक्त 'आहरण व संवितरण विषयक बॅक खाते' या एकाच बँक खात्यातील शिल्लक रकमेची माहिती भरतात आणि अन्य बँक खात्यांची माहिती प्रणालीमध्ये भरत नाहीत. त्यामुळे शासकीय

कार्यालयांच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांमधील शिल्लक शासकीय अखर्चित रकमांबाबतची परिपूर्ण, वस्तुनिष्ठ व अचूक माहिती उपलब्ध होत नाही. त्यासाठी माहे जुलै-२०२२ पासून सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना बँक खात्यांचे लगतपूर्व महिना अखेरचे बँक खाते विवरणपत्र (Bank Account Statement) किंवा बँक खातेपुस्तिकेच्या (Bank Passbook) पहिल्या पृष्ठाची व महिना अखेर शिल्लक रक्कम दर्शविणाऱ्या पृष्ठाची प्रत **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये अभिभारित / संलग्नित (Upload) करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

iv. तसेच **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** प्रणालीवर दरमहा मागील महिना अखेर बँक खात्यांची शिल्लक रक्कम भरताना विहित नमुन्यातील प्रमाणपत्र आहरण व संवितरण अधिकारी यांचे स्वाक्षरी व शिक्क्यासह पीडीएफ स्वरुपा अभिभारित / संलग्नित (Upload) करण्याची सक्ती देखील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना दि.०१.०७.२०२३ पासून अंमलात आणण्यात आली आहे.

v. या उपाययोजना केल्यानंतरही शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रणालीमध्ये अभिभारित / संलग्नित (Upload) केलेली बँक खाते विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेच्या पृष्ठांची स्कॅन्ड् प्रत व महिना अखेर बँक खात्यांची भरलेली शिल्लक रक्कम यामध्ये तफावत दिसून येते. तसेच चुकीच्या महिन्याचे बँक विवरणपत्राची किंवा बँक खातेपुस्तिकेच्या पृष्ठांची स्कॅन्ड प्रत अभिभारित / संलग्नित (Upload) करणे, दुसऱ्या खात्यांचे बँक विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेची विना स्वाक्षरीत स्कॅन्ड् प्रत अभिभारित / संलग्नित (Upload) करणे, बँक खाते विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेच्या पृष्ठांच्या प्रती ऐवजी अन्य कागदपत्रांची स्कॅन्ड् प्रत अभिभारित / संलग्नित (Upload) करणे असे प्रकार केल्याचे निदर्शनास आले आहे.

vi. या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयांच्या स्तरावर असलेल्या सर्व बँक खात्यांतील अखर्चित शासकीय रकमांची वस्तुनिष्ठ, अचूक आणि परिपूर्ण माहिती शासनास उपलब्ध व्हावी, यासाठी प्रभावी उपाययोजना करणेची आणि कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

(१) उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १ येथील शासन निर्णय या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अधिक्रमित करण्यात येत आहे. शासकीय कार्यालयांच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांमध्ये शिल्लक असलेल्या अखर्चित शासकीय रकमांची अचूक व वस्तुनिष्ठ माहिती 'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीच्या' (BEAMS च्या) माध्यमातून शासन स्तरावर उपलब्ध होण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

(२) सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी त्यांचे कार्यालयाच्या स्तरावर वापरात असलेल्या सर्व बँक खात्यांमध्ये मागील महिनाअखेर शिल्लक असलेल्या शासकीय अखर्चित रकमांची माहिती पुढील महिन्याच्या ५ ते १५ तारखेच्या दरम्यान (उदाहरणार्थ दिनांक ३० जून अखेर शिल्लक

असलेल्या शासकीय अखर्चित रकमांची माहिती दिनांक ५ ते १५ जुलै च्या दरम्यान) **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये सक्तीने भरावयाची आहे. तसेच सदर माहितीची पडताळणी करणे शक्य व्हावे, यासाठी त्या महिना अखेरचे बँक खाते विवरणपत्र (Bank Account Statement) किंवा बँक खातेपुस्तिकेच्या (Bank Passbook) पहिल्या पृष्ठाची व शिल्लक रक्कम दर्शविणाऱ्या पृष्ठाची स्वाक्षांकित वाचनीय / सुस्पष्ट स्कॅन्ड् प्रत PDF स्वरूपात आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये अभिभारित / संलग्नित (Upload) करणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे सर्व बँक खात्यांतील शिल्लक अखर्चित रकमांच्या अचूकतेबाबत आणि परिपूर्णतेबाबत या शासन निर्णयासोबतच्या सहपत्राद्वारे विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र देखील आहरण व संवितरण अधिकारी यांचे स्वाक्षरी व शिक्क्यासह PDF स्वरूपात प्रणालीवर अभिभारित / संलग्नित (Upload)करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

(३) आहरण व संवितरण अधिकारी यांनी **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये लॉगिन केल्यानंतर Maintenace या टॅब मध्ये DDO Bank Details हा पर्याय निवडावा. त्यानंतर बँक खात्याचे प्रकार जसे चालू खाते (Current Account), बचत खाते (Saving Account) हे पर्याय निवडण्यात यावेत. कार्यालयाच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांची माहिती अचूक रित्या भरण्यात यावी. बँक खात्याचे IFSC Code, Account Number व कोणत्या प्रयोजनासाठी सदरचे खाते उघडण्यात आलेले आहे, त्याची माहिती Purpose या टॅबमध्ये भरण्यात यावी. ही माहिती एकदाच भरावी लागणार आहे. तद्नंतर सदर माहिती भरल्यानंतर जतन (Save) करण्यात यावी. सदरची माहिती जतन (Save) केल्यानंतर पुनश्च: भरण्यासाठी उपलब्ध होणार नसल्याने काळजीपूर्वक भरण्यात यावी. सर्व बँक खात्यांची अचूक आणि परिपूर्ण माहिती भरली जाईल, हे सूनिश्चित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी हे व्यक्तिशः जबाबदार असतील.

(४) आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांमध्ये शिल्लक असलेल्या अखर्चित शासकीय रकमांबाबत **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये भरलेल्या माहितीची पडताळणी यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय किंवा संबंधित उप कोषागार कार्यालय यांचेमार्फत करण्यात येईल. त्यासाठी या कार्यालयांतील लेखापरीक्षण शाखांमधील लेखापरीक्षकांना आणि उप कोषागार कार्यालयाच्या संदर्भात उप कोषागार अधिकारी यांना ट्रेजरीनेट (TreasuryNet) प्रणालीतील त्यांचे लॉगिन मध्ये सदर माहिती आणि संबंधित बँक खाते विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेचे संबंधित पृष्ठ स्कॅन्ड् PDF स्वरूपात पडताळणीसाठी (View Only) उपलब्ध होईल.

(५) संबंधित लेखापरीक्षक किंवा उप कोषागार कार्यालयाच्या बाबतीत संबंधित उप कोषागार अधिकारी यांनी ट्रेजरीनेट (TreasuryNet) प्रणालीमध्ये आहरण व संवितरण अधिकारी यांच्या कार्यालयाच्या स्तरावर वापरात असलेल्या प्रत्येक बँक खात्यातील अखर्चित रकमांबाबत पडताळणी बँक खाते विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेचे संबंधित पृष्ठ यांच्या स्कॅन्ड् प्रतीच्या PDF च्या आधारे करावयाची असून, तफावत न आढळल्यास, भरण्यात आलेल्या

माहितीस मान्यता देऊन, माहिती स्वीकृत करावयाची आहे. तसेच भरलेली माहिती आणि अभिभारित / संलग्नित (Upload) करण्यात आलेले संबंधित बँक खाते विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेचे संबंधित पृष्ठ यावरील माहिती यामध्ये तफावत आढळून आल्यास किंवा विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अभिभारित / संलग्नित (Upload) करण्यात आले नसल्यास, अशी माहिती प्रणालीवर नाकारायची आहे. सदर कार्यवाही संबंधित लेखापरीक्षक आणि संबंधित उप कोषागार अधिकारी यांनी न चूकता रोजच्या रोज करावयाची असून, यामध्ये कोणत्याही परिस्थितीत विलंब होणार नाही, याची कटाक्षाने दक्षता घ्यावयाची आहे.

(६) प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेनंतर आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील प्रत्येक बँक खात्याच्या संदर्भात **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये मागील महिनाअखेर शिल्लक असलेल्या अखर्चित रकमांची माहिती विहित कालमर्यादेत भरल्यानंतरच आणि संबंधित लेखापरीक्षक किंवा उप कोषागार अधिकारी यांनी त्यास पडताळणीअंती मान्यता देऊन, सदर माहिती स्वीकृत केल्यानंतरच संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मधून अर्थसंकल्प प्राधिकारपत्र (BEAMS Authorization Slip) तयार करणे आणि / किंवा बिल पोर्टल प्रणालीवरुन कोणतेही देयक तयार करणे शक्य होईल.

काही प्रशासकीय किंवा तांत्रिक स्वरुपाच्या कारणांमुळे सदर प्रक्रिया पार पाडणे एखादया आहरण व संवितरण अधिकाऱ्यांस शक्य झाले नाही, आणि त्यांना त्याचवेळी निधी तातडीच्या परिस्थितीत आहरित करावयाचा असेल, अशा निकडीच्या प्रसंगी अपवादात्मक आणि विशेष बाब म्हणून संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या परवानगीने संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मधून अर्थसंकल्प प्राधिकारपत्र (BEAMS Authorization Slip) तयार करणे आणि / किंवा बिल पोर्टल प्रणालीमधून देयक तयार करणेबाबतचे कामकाज पूर्ण करता येईल.

(७) बँक खात्यांमधील अखर्चित रकमांची माहिती पडताळणी अंती संबंधित लेखापरीक्षक आणि उप कोषागार अधिकारी यांनी अमान्य / अस्वीकृत केल्यानंतर संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना याबाबतचा संदेश **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** द्वारे प्राप्त होईल. तद्नंतर संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सर्व बँक खात्यांतील अखर्चित रक्कमांची अचूक व वस्तुनिष्ठ माहिती तात्काळ **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये भरुन या शासन निर्णयासोबतच्या सहपत्राद्वारे विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र आणि त्या महिना अखेरचे बँक खाते विवरणपत्र किंवा बँक खातेपुस्तिकेच्या पहिल्या पृष्ठाची व शिल्लक रक्कम दर्शविणाऱ्या पृष्ठाची स्वाक्षांकित वाचनीय / सुस्पष्ट स्कॅन्ड् प्रत प्रणालीमध्ये PDF स्वरूपात अभिभारित / संलग्नित (Upload) करायची आहे. त्यानंतर सदर माहिती संबंधित लेखापरीक्षक आणि उप कोषागार अधिकारी यांनी पडताळणीअंती मान्य करुन स्वीकृत केल्यावरच संबंधित आहरण व संवितरण अधिकारी हे **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मधून अर्थसंकल्प प्राधिकारपत्र (BEAMS Authorization Slip) किंवा बिल पोर्टल प्रणालीमधून देयक तयार करु शकतील.

(८) आहरण व संवितरण अधिकारी यांनी **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली'** मध्ये अभिभारित / संलग्नित (Upload) केलेली प्रत्येक बँक खात्यातील अखर्चित रकमेची माहिती, अभिभारित / संलग्नित (Upload) केलेले संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि शिल्लक रक्कम दर्शविणारी बँक खातेपुस्तिकेच्या पृष्ठांची / बँक विवरणपत्राची वाचनीय / सुस्पष्ट स्कॅन्ड् केलेली PDF स्वरुपातील प्रत यांची पडताळणी करणेबाबत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई; जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांनी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर सूचना संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याद्वारे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. तसेच शासकीय कार्यालयांच्या स्तरावरील सर्व बँक खात्यांमधील महिना अखेर शिल्लक अखर्चित शासकीय रकमांची बँक खाते निहाय - कार्यालय निहाय आणि मंत्रालय प्रशासकीय विभाग निहाय माहिती संस्करीत करुन, तिचे विश्लेषण करुन अर्थपूर्ण अहवाल समुचित नमुन्यात शासनास नियमितपणे सादर करण्याची कार्यवाही संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याद्वारे करण्यात येईल.

(९) यापूर्वी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन उपरोक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक २ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक २.४ अन्वये बँक खात्यांच्या प्रकटीकरणाच्या संदर्भात देण्यात आलेले निर्देश आणि विहित करण्यात आलेली कार्यपध्दती कायम ठेवण्यात येत असून, या शासन निर्णयामुळे त्यास कोणतीही बाधा निर्माण होणार नाही.

(१०) सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी दि.१ ऑगस्ट २०२४ पासून प्रथम नाशिक विभागामध्ये पथदर्शी स्वरुपात आणि त्यानंतर दि.१ सप्टेंबर, २०२४ पासून उर्वरित सर्व विभागांमध्ये सार्वत्रिक स्वरुपात करण्यात येईल. सदर निर्देश आणि कार्यपध्दती SNA बँक खात्यांच्या संदर्भात लागू असणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक २०२४०६२५१५५९१७९१०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2024.06.25 16:11:49 +05'30'

( डॉ.राजेंद्र गाडेकर )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,

४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
८. अ.मु.स/प्र.स./सचिव ,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१०.प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१२.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१५.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१७.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०.प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
२२.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२३.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२४.सर्व विभागीय आयुक्त,
२५. सर्व जिल्हाधिकारी,
२६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२८.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२९.प्रादेशिक सह संचालक,लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/ नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/नागपूर
३०.संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई,
३१.प्रादेशिक सह संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर,
३२.वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजी नगर / अमरावती/नागपूर
३३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३४.सर्व उप कोषागार अधिकारी,
३५. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३६.निवड नस्ती कोषा प्रशा.५

**शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२४/प्र.क्र.५०/कोषा प्रशा-५ सोबतचे सहपत्र**

**सहपत्र**

**प्रमाणपत्र**

मी,याद्वारे प्रमाणित करतो / करते की, ------------------------------------------ -----या कार्यालयाच्या स्तरावर शासकीय निधीच्या संदर्भात एकूण ------------ इतकी बँक खाती वापरात असून या सर्व बँक खात्यांतील शिल्लक अखर्चित शासकीय रकमांबाबत **'अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणाली (BEAMS प्रणाली)'** मध्ये नोंदविण्यात आलेला संपूर्ण तपशील माझ्या सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. सदर माहितीपैकी कोणतीही माहिती खोटी किंवा असत्य किंवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास, त्यासाठी मला व्यक्तीशः जबाबदार धरले जाऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे.

**स्वाक्षरी, नांव व पदनाम**

**दिनांक:-** **आहरण व संवितरण अधिकारी**